# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १३७-२२** **दिनांक :- १३/०५/२०२२**

## मसाज व एक्स्ट्रा सर्व्हिसच्या नावाखाली अश्लिल कृत्य करणाऱ्या स्पा वरती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई

दि.१२.०५.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष यांना त्यांचे बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, "रेन द स्पा" गाळा नं.९,१०,११ नवओंकार सोसायटी, एमआयडीसी. रोड, रॉयल पार्क, श्रीकृष्ण गार्डनच्या समोर, मिरारोड पूर्व.काशिमीरा या स्पामध्ये मसाजच्या नावाखाली ठेवलेल्या मुली सदर ठिकाणी येणाऱ्या गिऱ्हाईकाशी अश्लील चाळे करुन एक्स्ट्रा सर्व्हिस देत असतात व नमुद मुली करीत असलेल्या कृत्यास सदर स्पाचे चालक प्रोत्साहीत करीत आहेत.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वपोनि. श्री.एस.एस.पाटील, यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना "रेन द स्पा" गाळा नं.९,१०,११ नवओंकार सोसायटी, एमआयडीसी. रोड, रॉयल पार्क, श्रीकृष्ण गार्डनच्या समोर, मिरारोड पूर्व.काशिमीरा या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १४.४५ वा. छापा टाकला आसता स्पा मध्ये एक महिला बोगस गिऱ्हाईकाशी अश्लील चाळे करीत असताना मिळुन आली. तसेच नमुद महिला व सदर स्पाचे चालक चिराग शहा, वय-४० वर्ष यांनी आपसात संगनमत करुन मसाज व एक्स्ट्रा सर्व्हिस (अतिरिक्त सेवा) च्या नावाखाली महिलेने बोगस गिऱ्हाईकाकडुन २,५००/- रु स्वीकारुन सदरच्या कृत्यास चालकाने प्रोत्साहीत केल्याचे निदर्शनास आल्याने नमुद महिला व चालक यांना बोगस गिऱ्हाईकाकडुन स्वीकारलेली रक्कम, मोबाईल हॅण्डसेट व कॅश काऊन्टर मधुन जप्त केलेली रोखड असे एकुण ६,०३०/-रुपये मद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत मपोहवा/०३०१५ वैष्णवी यंबर, नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. I ३१९/२०२२, भा.द.वि.सं. कलम २९४,११४,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहा. पोलीस आयुक्त, श्री. अमोल मांडवे, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री.संपतराव पाटील, सपोउनि.उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, मपोहवा/वैष्णवी यंबर व मपोहवा/सुप्रिया तिवले नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----